महाराष्ट्र शासन

# महाराष्ट्र राज्य कला शिक्षण मंडळ

सर ज.जी. कला शाळा आवार, डॉ दा.नौ. मार्ग, मुंबई- ४०० ००१ . दुरध्वनी क्र. ०२२-२२६२०३०४

Email: director.msbae@gmail.com

**क्रमांक :- कशिमं/शारेप-२०२४/५७** **दिनांक:- १६.०७.२०२४**

वाचावे :- १) शासन निर्णय क्रमांक /एडीआर-२०१४/प्र.क्र.२१८/तांशि-६, दिनांक १६.०२.२०१५.
२) मराकशिमं-२०२४/आस्था/११, दिनांक ०५.०६.२०२४.

## परिपत्रक

कला संचालनालय महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्याकडून शासकीय रेखाकला (एलिमेंटरी व इंटरमिजिएट ड्रॉईंग ग्रेड) परीक्षा घेण्यात येत होत्या, तथापि, महाराष्ट्र राज्य कला शिक्षण मंडळ, अधिनियम २०२३ दि. २३/०२/२०२४ पासून लागू करण्यात आला आहे. महाराष्ट्र राज्य कला शिक्षण मंडळ अधिनियम, २०२३ कलम ८ मधील तरतुदीनुसार सन २०२४-२०२५ पासून शासकीय रेखाकला (एलिमेंटरी व इंटरमिजिएट **ड्रॉईंग ग्रेड**) परीक्षा, मंडळाकडून घेण्यात येणार आहे.

शासकीय रेखाकला परीक्षेच्या पुर्नरचित अभ्यासक्रमास दिनांक १६.०२.२०१५ रोजीच्या शासन निर्णयानुसार मान्यता देण्यात आलेली आहे. त्यानुसार शासकीय रेखाकला (एलिमेंटरी व इंटरमिजिएट ड्रॉईंग ग्रेड) परीक्षा २०२४, दिनांक २५ सप्टेंबर, २०२४ ते दिनांक २८ सप्टेंबर, २०२४ या कालावधीमध्ये घेण्यात येणार आहे.

संबंधित सर्व केंद्र प्रमुख यांना कळविण्यात येते की, शासकीय रेखाकला परीक्षेकरिता विद्यार्थ्यांचे नाव नोंदणी करताना दोन्ही पैकी (एलिमेंटरी किंवा इंटरमिजिएट) एकाच परीक्षेसाठी सर्वसाधारण नोंदवहीतील (General Register) नावाप्रमाणे अचूक नावाची ऑनलाईन नोंदणी करावी. शासकीय रेखाकला परीक्षा केंद्रांची नोंदणी, विद्यार्थ्यांची नोंदणी व परीक्षा फी ऑनलाईन पध्दतीने https://www.msbae.org.in या संकेतस्थळावर भरावयाची असल्यामुळे याबाबत सदर परीक्षेस प्रविष्ठ होऊ इच्छिणाऱ्या सर्व संबंधित विद्यार्थी, पालक व सहभागी शाळा यांच्या शासकीय रेखाकला परीक्षा केंद्र प्रमुख यांनी निदर्शनास आणावे.

शासकीय रेखाकला (एलिमेंटरी व इंटरमिजिएट ड्रॉईंग ग्रेड) परीक्षेचे सविस्तर वेळापत्रक तसेच ऑनलाईन पध्दतीने करण्यात येणाऱ्या नोंदणीचा तक्ता खालील प्रमाणे.

### शासकीय रेखाकला (एलिमेंटरी व इंटरमिजिएट ड्रॉईंग ग्रेड) परीक्षा- २०२४

***एलिमेंटरी ड्रॉईंग ग्रेड परीक्षा वेळापत्रक***

| अ.क्र. | विषयाचे नाव | परीक्षेची वेळ |
|---|---|---|
| | *बुधवार, दिनांक २५ सप्टेंबर, २०२४* | |
| १ | वस्तुचित्र (Object Drawing) | १०.३० ते १.०० (२.३० तास) |
| २ | स्मरणचित्र (Memory Drawing) | २.०० ते ४.०० (२.०० तास) |
| | *गुरुवार, दिनांक २६ सप्टेंबर, २०२४* | |
| ३ | संकल्पचित्र-नक्षीकाम (Design) | १०.३० ते १.०० (२.३० तास) |
| ४ | कर्तव्यभूमिती व अक्षरलेखन (Plane Geometry & Lettering) | २.०० ते ४.०० (२.०० तास) |

## *इंटरमिजिएट ड्रॉईंग ग्रेड परीक्षा वेळापत्रक*

| | | |
|---|---|---|
| *शुक्रवार, दिनांक २७ सप्टेंबर, २०२४* | | |
| १ | स्थिरचित्र (Still Life) | १०.३० ते १.३० (३.०० तास) |
| २ | स्मरणचित्र (Memory Drawing) | २.३० ते ४.३० (२.०० तास) |
| *शनिवार, दिनांक २८ सप्टेंबर, २०२४* | | |
| ३ | संकल्पचित्र-नक्षीकाम (Design) | १०.३० ते १.३० (३.०० तास) |
| ४ | कर्तव्य भूमिती, घनभूमिती व अक्षरलेखन (Geometry, Solid Geometry & Lettering) | २.३० ते ५.३० (३.०० तास) |

| अ.क्र. | तपशील | कालावधी |
|---|---|---|
| १ | केंद्रांची नोंदणी / केंद्राची माहिती अद्यावत करणे ऑनलाईन पध्दतीने. | दिनांक ०१.०८.२०२४ ते दिनांक ०५.०८.२०२४ पर्यंत |
| २ | केंद्राच्या अधिनस्त असलेल्या सहभागी शाळांची नोंदणी ऑनलाईन पध्दतीने. | दिनांक ०१.०८.२०२४ ते दिनांक ०५.०८.२०२४ पर्यंत |
| ३ | एलिमेंटरी व इंटरमिजिएट परीक्षेस प्रविष्ट होणाऱ्या विद्यार्थ्यांची नोंदणी ऑनलाईन पध्दतीने करणे. | दिनांक ०५.०८.२०२४ ते दिनांक ३१.०८.२०२४ पर्यंत. |
| ४ | परीक्षक, समालोचक व उपमुख्य समालोचक नोंदणी ऑनलाईन पध्दतीने करणे. | दिनांक १४.०८.२०२४ ते दिनांक ३१.०८.२०२४ पर्यंत. |

ऑनलाईन पध्दतीने करावयाची नोंदणी व संबंधित माहिती https://www.msbae.org.in या संकेतस्थळावर उपलब्ध राहील. तसेच परीक्षा फी ऑनलाईन भरण्याबाबत स्वतंत्र परिपत्रकाद्वारे कळविण्यात येई

(विनोद दांडगे)
संचालक,
महाराष्ट्र राज्य कला शिक्षण मंडळ, मुंबई.

प्रति,
केंद्र प्रमुख, शासकीय रेखाकला परीक्षा तथा प्राचार्य /मुख्याध्यापक (सर्व).
प्रत :- माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित.

१) आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे.
२) अवर सचिव,उच्च व तंत्रशिक्षण विभाग (तांशि-६) मंत्रालय मुंबई
३) संचालक, कला संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
४) शिक्षण संचालक, (माध्यमिक व उच्च माध्यमिक) महाराष्ट्र राज्य, पुणे.
५) विभागीय शिक्षण उपसंचालक (सर्व).
६) सचिव, महाराष्ट्र राज्य कला शिक्षण मंडळ, मुंबई.
७) उपसचिव (कला), महाराष्ट्र राज्य कला शिक्षण मंडळ, मुंबई /नागपूर/छत्रपती संभाजीनगर.
८) उप आयुक्त, परीक्षा परिषद, पुणे.
९) शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हापरिषद (सर्व)
१०) शिक्षणाधिकारी, नगरपालिका/महानगरपालिका (सर्व)

११) शिक्षण निरीक्षक (दक्षिण/उत्तर/पश्चिम), बृहन्मुंबई.
१२) प्राचार्य, संगीत आणि कला अकादमी, कला विभाग, बृहन्मुंबई महानगर पालिका, शिक्षण विभाग, मुंबई.
१३) जिल्हा विद्यालय निरीक्षक, (सर्व) उत्तरप्रदेश / मध्यप्रदेश / उत्तराखंड/ छत्तीसगढ/गोवा.